**Indian Streams Research Journal**
**Volume 2, Issue. 12, Jan. 2013**
**ISSN:-2230-7850**
Available online at www.lbp.world

ORIGINAL ARTICLE

# दलित कादंबरी बदलते संदर्भ ः एक मुल्यमापन

**प्रा. डॉ. डी. आर. गायकवाड**
मराठी विभाग , दयानंद कॉलेज ऑफ आर्टस् आणि सायन्स सोलापूर .

**प्रस्तावनाः**

भारतीय घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवनकार्य आणि क्रांतिकारक विचार-तत्वज्ञानाच्या प्रमुख प्रेरणेतून दलित साहित्याची निर्मिती झाली. कविता, कथा, कादंबरी, नाटक व आत्मकथा आदी साहित्यप्रकारातून दलित लेखकांने आपल्या जीवघेण्या व्यथा, वेदनांचे दाहक चित्रण घडविले आहे. प्रस्तुत शोधनिबंधात केवळ दलित कादंब-यांचा अभ्यास अपेक्षीत आहे. दलित साहित्यातून घडणारे हे चित्रण केवळ व्यक्तिनिष्ठ नाही तर समष्टिनिष्ट आहे. परिणामी हे सर्वच लेखन सांस्कृतीक दस्तऐवज म्हणून महत्वाचे ठरते. सदर अभ्यास वर्णनात्मक, तुलनात्मक व समाजशास्त्रीय संशोधन पध्दतीचा अवलंब करून करण्याचे नियोजन आहे.

दलित कविता आणि कथेच्या तुलनेत कादंबरीविश्व लहान आहे. स्वातंत्र्पुर्वकाळात दलितेतर लेखकांनी दलित जीवनावर कादंबरीलेखन केले आहे. परंतु बव्हंशी लेखन सहानुभूतीतून निर्माण झालेले आढळते. श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांनी **1925** मध्ये ‘श्यामसुंदर’ ही कादंबरी लिहीली. स्पृश्यवर्गाच्या सहानुभूतीतून स्पृश्य अस्पृश्य दरी कमी होउ शकेल असे त्यांना वाटत होते. पण त्यांना ते प्रभावीपणे व्यक्त करता आले नाही. वि.स. खांडेकर यांची ‘दोनमने’ कादंबरी **1927** च्या महाड चवदार तळयाच्या सत्याग्रहाच्या पार्श्वभूमीवर बेतलेली आहे. ती **1938** मध्ये प्रकाशित झाली. परंतु त्यातील नायक दलित असला तरी तो अतिशय दुबळा आणि निष्क्रिय आहे. ना. सी. फडके यांनीही ‘प्रतिज्ञा’ [**1941**] आणि ‘धर्म’ [**1946**] या कादंब-या अस्पृश्याविषयीच्या गहिवरातून लिहील्या आहेत. स्पृश्य आणि अस्पृश्यांनी परस्पर जुळवून घेण्याची ‘प्रतिज्ञा’ करून .... त्या प्रकारचा उपदेश पहिल्या कादंबरीत केल्याचे जाणवते तर अस्पृश्य हा अस्पृश्य नसतोच तर तो स्पृश्य असतो असा चमत्कारपूर्ण संदेश फडक्यांनी दुस-या कादंबरीत दिला आहे. विट्ठल दत्तात्रय चेंदरकर यांची ‘महापूर’ [**1942**] ही कादंबरी अस्पृश्यता निवारणावर असली तरी ती कायद्याने अस्पृश्यता नष्ट होणार नाही असा विचार व्यक्त करते. तर गीता साने यांच्या ‘धुके आणि गहिवर’ [**1942**], या कादंबरीत अस्पृश्यता निवारण्यासाठी स्पृश्यानींच पुढाकार घ्यावा असा महत्वपूर्ण विचार सुचविण्यात आला आहे. ग. त्र्य. माडखोलकर यांच्या ‘चंदनवाडी’ [**1943**], या कादंबरीत मात्र डॉ. बाबासाहेब आबेडकर विचारांनी प्रभावित झालेल्या नायकाचे चित्र येते. ‘पारिजातकाची फुले’ या वि. व. हडपांच्या कादंबरीत अस्पृश्यांचा वसाहतीत रस्ते झाडण्याचे काम अस्पृश्यतानिवारण होईल अशी गांधी प्रभावाची भाबडी कल्पना प्रकटते. शांताबाई नाशिककरांनी आपल्या कादंबरीमधून ‘किर्ती’ [**1942**] अस्पृश्यांशी जवळीक साधली की अस्पृश्यता नष्ट होईल अशी भावना व्यक्त केली आहे. मात्र अस्पृश्यांच्या हक्काचा प्रश्न त्यांनी गौण मानला आहे. विभावरी शिरूरकर यांनी ‘बळी’ [**1950**] ह्या कादंबरीत गुन्हेगार मानल्या गेलेल्या मांग गारूडी समाजाच्या वस्तुनिष्ठ जीवनाचे रेखांकन प्रभावीपणे केले आहे. चोरजमात म्हणून परंपरेने आपल्या माथ्यावर मारला गेलेला शिक्का पुसून टाकण्याचा अन्यायाविरूध्द, सर्व स्तरांवर संघर्ष करण्याचा प्रयत्न करीत असताना आवाचे काही जातबांधव चोरीच्या पूर्वधंद्याकडे जाण्यासाठी समाजाल पुन्हा प्रवृत्त करतात म्हणून त्याचाच ‘बळी’ घेतला जातो.

तेव्हा वरील मान्यवर दलितेतर कादंबरीकारांचे लेखन कलात्मकतेच्या दृष्टीने वाचनीय असले तरी दलितांविषयीचा कळवळा व्यक्त करण्याचाच तो प्रयत्न होता. अपवाद मात्र माडखोलकर आणि विभावरी शिरूरकर यांचा आहे. **1950** नंतर दलित कादंबरीकारांच्या निर्मितीतून स्वानूभव प्रतीत होतो. तसेच व्यक्तिनिष्ठेपेक्षा समूहनिष्ठेला प्राधान्य दिले गेले आहे. फार

थोडे अपवाद वगळता दलित कादंबरीकारांनी रंजनवादी व काल्पनिक लेखन न करता उपेक्षीत, बहिष्कृत पीडित जीवनाचे आत्मप्रत्ययी चित्रण केले आहे. या कादंब-यांचा आणखी एक विशेष भूतकाळाचा व इतिहासाचा अन्वयार्थ लावत वर्तमानाचे कठोर वास्तव आणि अलक्षीत अशी जाती समूहांचे दुःखदर्शन त्यातून प्रभावीपणे मांडण्यात आहे आहे.

स्वातत्रयपूर्वकाळात ना.रा. शेंडे, ना. बं. जाधव, तुकाराम अंबादास पुरोहित, नामदेव व्हटकर या कादंबरीकारांनी अस्पृश्यांच्या वाट्याला आलेल्या सामाजिक दुःखाची मांडणी करण्याचा प्रयत्न केला आणि **1950** नंतरही त्यांचे लेखन प्रकाशित होत राहिले. दलित कादंबरी निर्मितीच्या प्रारंभ काळातील हे लेखन महत्वाचे ठरते.

**काही महत्वाचे दलित कादंबरी लेखक. ना. रा. शेंडे** ः ना.रा. शेंडे हे फडके खांडेकरांच्या काळातील आणि प्रभावाखालील लेखक असून आणि त्याशी कबुलीही त्यांनी दिलेली आहे. **1938** मध्ये प्रकाशित झालेल्या 'शृंगारलेले प्रेत' या कादंबरीच उल्लेख त्याचेच द्योतक आहे. मात्र **1950** नंतर त्यांनी दलित आदिवासींच्या जीवनाचा वेध घेतला. 'काजळी रात्र' **[1950]**, 'तांबडा दगड' **[1968]**, 'विलासिनी' **[1974]**, 'अंशुजा' **[1974]** या कादंबरीमधून दलित आदिवासी जीवन आलेले असले तरी त्यातून अध्यात्म व अतींद्रिय विश्वाचे माहात्म्य डोकावते. त्यांना डॉ. आंबेडकरी लढ्यातील नायक प्रभावीपणे रेखाटता आला नाही.

**नामदेव व्हटकर**ः 'अपराधी' **[1943]**, या आपल्या कादंबरीत बेवारशी मुलांचा प्रश्न नामदेव व्हटकर मांडतात. तर 'सोळा शिणगार' **[1968]**, या कादंबरीत उपेक्षीत तमासगिराच्या जीवनाचे चित्रण करतात. दलितांच्या अन्य समस्यांना त्यांनी स्पर्श केला नाही. तथापि दलित कादंबरी लेखनाच्या प्रारंभ काळातील एक महत्वाचे लेखक म्हणून त्यांनी दिलेले योगदान महत्वाचे ठरते.

**ना. बं. जाधव** ः जाधवांनी स्वातंत्रयपूर्वकाळातच लेखनाला प्रारंभ केला असला तरी त्यांच्या कादंबरी स्वातंत्रयोत्तर काळात प्रकाशित झाल्या आहेत. 'डॉ. अंजना' **[1972]**, 'अपर्णा' **[1974]**, 'राजाभाऊ' **[1974]**, 'दे दान सुटे गि-हान' **[1976]**, या कादंबरीमधून महार-मांग या समाजाच्या व्यथा वेदनांचे चित्र आले असले तरी दलितांच्या मुलभूत सामाजिक दुःखाशी ते भिडलेले जाणवत नाही, रंजकता आढळते.

**अण्णा भाउ साठे** ः "ही पृथ्वी शेषाच्या मस्तकावर तरली नसून ती दलितांच्या तळहातावर तरली आहे त्या दलितांचे जीवन तितक्यात प्रामाणिक हेतून नि निष्ठेनं मी चित्रित करणार आहे नि करीत आहे." [प्रस्तावना ः वैजयंता ः पृ.**2**] ही अण्णा भाऊंची प्रतिज्ञा प्रारंभकाळात समुचित होती. मात्र नंतरच्या कालखंडात त्यांनी व्यावसायिक प्रकाशकांच्या आग्रहास्तव आर्थिक स्वास्थ्यासाठी काही रंजनवादी कादंबरी लिहील्या. अण्णा भाऊंची ही तडजोड असली तरी 'फकिरा' **[1941]** सारखी कादंबरी मराठी साहित्यात अजोड आहे. बहुचर्चित आणि अत्यंत लोकप्रिय ठरलेल्या कादंबरीत अण्णाभाऊ साठे यांनी दलित समाजातील मातंग समाजाचे साहसी दर्शन घडविले आहे. ही कादंबरी नायक प्रधान आहे. रामोजी मांगच्या रूपाने लेखकाने मातंग समाजाच्या शौर्याचे घडविले दर्शन अप्रतीम आहे. साधी, सोपी सहज भाषाशैली, प्रवाही घटना-प्रसंग, चांगली वातावरण निर्मिती व उत्कृष्ट निवेदनशैलीमुळे कादंबरी लक्षणीय झाली आहे. त्यांच्या प्रकाशित कादंबरी अशा 'वारणेच्या खो-यात' **[1951]**, 'चित्रा' **[1951]**, 'फकिरा' **[1959]**, 'वैजयंता' **[1959]**, 'चंदन' **[1962]**, 'अलगुज' **[1961]**, 'माकडीचा मळा' **[1963]**, 'आवडी' **[1963]**, 'गुलाम' **[1964]**, 'वैर' **[1963]**, 'चिखलातील कमळ' **[1965]**, 'धुंद' **[1966]**, 'कुरूप' **[1966]**, 'पाझर' **[1969]**, 'रानगंगा' **[1969]**, 'अग्निदिव्य' **[1969]**, 'रानकोबा' **[1969]**, 'आघात' **[1969]**, 'केवडयाचं कणीस' **[1969]**, 'आग' **[1969]**, 'संघर्ष' **[1969]**, 'रूपा' **[1969]**, 'पूर्ती' **[1970]**, 'मंगला' **[1971]**, 'डोळे मोडित राधा चाले' **[1971]**, 'मास्तर' **[1975]**, 'रत्ना' **[1975]**, 'फुपाखान' **[1977]**, अण्णा भाउंच्या मृत्युनंतर **[1969]** त्यांच्या कादंबरी प्रकाशित झाल्या आहेत. अण्णा भाऊ साठे यांनी विविध जाती-धर्मातील नायक आपल्या कादंबरीतून जिवंत केले. मराठी कादंबरी विश्वाल त्यांनी दिलेले योगदान लक्षणीय आहे.

**शंकरराव खरात** ः शंकरराव खरातांनी पहिली कादंबरी 'माणुसकीची हाक' **[1957]**, मध्ये लिहीली. या कादंबरीतील संघर्ष दलित विरूध्द सवर्ण असा आहे. ही कादंबरी पुस्तक रूपाने प्रकाशित झाली नाही. मात्र 'हातभट्टी' **[1970]**, 'मी मुक्त मी मुक्त' **[1971]**, 'झोपडपट्टी' **[1973]**, 'गावचा टिनोपाल गुरूजी' **[1973]**, 'मसालेदार गेस्ट हाऊस' **[1974]**, 'पारधी' **[1980]**, 'फूटपाथ नं 1' **[1980]**, 'मी माझ्या गावाच्या शोधात' **[1981]**, 'बऱ्याची दिंडी' **[1982]**, या बहुचर्चित अशा

कादंबरी आहेत.'गावचा टिनोपाल' आणि 'मसालेदार गेस्ट हाऊस' या कादंबरी ग्रामीण जीवनातील राजकारणाला आणि शिक्षणव्यवस्थेला लक्ष्य करणा-या आहेत. खरातांचा दलित नायक सहनशील प्रकृतीचा आहे. दलित जीवनाचे सूक्ष्म तपशील मांडणारा खरातांसारखा दुसरा दलित कादंबरीकार आढळत नाही. मोजके घटना प्रसंग, प्रभावी व्यक्तीरेखा, जिवंत भाषा, चांगली वातावरण निर्मिती यामुळे त्यांचे कादंबरी लेखन उत्कृष्ठ झाले आहे.

**हिं. गो. बनसोडे** ः हिंदुराव बनसोडे यांच्या 'मुक्तिसंग्राम' [1969], 'उज्वला' [1973], 'आभाळाएवढी' [1981], या तीन कादंबरी प्रसिध्द आहेत. धर्मांतरानंतर महार मांगांनी गावकीची कामे नाकारली म्हणून सवर्णांच्या रोषाला बळी पडणे आणि त्याविरूध्द संघर्ष करणे हा 'मुक्तीसंग्रामा'चा विषय आहे. 'उज्वला' साध्या सरळ माणसाला स्वीकाराव्या लागणाया आव्हानांची कथा आहे. 'आभाळाएवढी' एका आगळया विषयावरची कादंबरी आहे. सावित्रिबाई फुले आणि म. ज्योतिबा फुले यांच्या अनुबंधनावर साहचर्यावर आणि कर्तृत्वावर या कादंबरीत लेखकाने प्रकाश टाकला आहे आणि त्यात ते यशस्वी ठरतात.

**केशव मेश्राम** ः वैविध्यपूर्ण व वैश्ष्टियपूर्ण लेखन करणारा एक महत्वाचा लेखक समर्थ कवी कादंबरी लेखनाकडे वळतो तेव्हा त्यांचे कादंबरी लेखन किती सशक्त असते याचे प्रत्यंतर केशव मेश्राम यांच्या 'हकीकत' आणि 'जटायु' [1972] या आत्मकथनात्मक कादंबरीतून येते. आत्मकथन हे 'हकिकत' चे वैशिष्टये तर 'जटायु' मध्ये दलित समाजातील दुरावस्थेचे, पीडनाचे प्रत्ययकारी चित्रण येते. दलित समाजातील महार-मांग समाजाचे अंतर्गत कलह प्रभावी रितीने येथे प्रकटते. 'पोखरण' [1979] ही मेश्रामांची तितकीच महत्वाची कादंबरी. या कादंबरीत आर्य-अनार्य यांच्या अगदी प्रारंभीच्या संबंधाचे कथानक येते. ही एकूणच दलित कादंबरीसृष्टीत एका अज्ञात व वेगळया विषयांवरील कादंबरी आहे. आर्यपूर्व संस्कृतीचा अनोखा व अपरिचित असा उल्लेख वाचकांना अपरिचित अशा वातावरणात घेऊन जातो, हे या कादंबरीचे वैशिष्टये होय.

**बाबूराव बागुल** ः दलित कथेतील विद्रोही वादळ म्हणजे बाबूराव बागूल. त्यांच्या कादंबरी लेखनाने दलित कादंबरी विश्वाला नवे आयाम प्राप्त झाले आहेत. 'अघोरि' [1983] ही सामाजिक प्रदुषण आणि शोषण याविरूध्द बंड करणारी कादंबरी आहे. असे असले तरी अघोरी विद्या मंत्रतंत्र यावर बागूलांनी अतिरिक्त भर दिला आहे. तसेच या कादंबरीतील शृंगारवर्णने अतिरिक्त वाटतात. वाङ्मयीन दृष्टीने श्रेष्ठ असलेल्या 'सूड' [1970] या लघुकादंबरीचा विषय पुरूषसत्तेचा सूड उगविणा-या 'जानकी' या अत्याचारित दलित स्त्रीचा जीवनप्रवास आहे. 'सूड' ही कादंबरी स्त्री देहाचा तिरस्कार करणा-या जानकीचा स्त्री देहाचे महत्व पटवून देणारी आहे. 'कोंडी' [2000] ही कादंबरी समाजात आमुलाग्र कांती घडविण्याची आकांक्षा बाळगणा-या उच्च विद्याविभुषीत आंबेडकरवादी दलित नायकाची कहाणी आहे. बागूलांच्या अन्य कादंबरी 'पावश्या' [1971], 'पाषाण' [1972], 'भूमिहीन' [1979], 'दंश' [1980] इत्यादी होय.

**बा. सं. हाटे** ः हाटे यांनी दलित चळवळी हाच आपल्या कादंबरी लेखनाचा मुख्य विषय निवडल आणि 'युगविधान' [1983] 'युगंधर' [1988], 'युगान्त' [अप्रकाशित] ह्या कादंबरी लिहील्या. आंबेडकरपुर्व दलित चळवळीची पूर्वपिठीका, महाडचा चवदार तळयाचा सत्याग्रह हा भाग पहिल्या कादंबरीत आहे. दुसया कादंबरीत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कर्त ृत्वाचा व नेतृत्वाचा आलेख दुग्गोचर होतो. तिसरी कादंबरी बाबासाहेबांचे निर्वाण नंतरची राजकीय आंदोलने आणि पडझड यावर प्रकाश टाकते. अशी ही त्रिदल कादंबरी दलित कादंबरी विश्वात पहिलीच होय. नंतर त्यांनी आदिवासीवरील अन्याय अत्याचारावर आधारित 'भोगवटा' ही कादंबरी लिहीली. आदिवासीवरील अन्याय अत्याचारावर आधारित 'भोगवटा' ही कादंबरी महत्वाची ठरते.

**भीमसेन देठे** ः देठे यांची 'इस्कोट' ही महत्वाच्या विषयांवरील कादंबरी. धर्मांतरानंतर एकूण सामाजिक जीवनावर झालेले परिणाम, दलित-सवर्ण संघर्ष आणि दलितांमध्ये घडलेले परिवर्तन यांची नोंद अतिशय प्रभावीपणे 'इस्कोट' या कादंबरीत घेतली गेली आहे. त्यानंतर देठे यांच्या प्रकाशित झालेल्या 'घुमसट' [1988], व 'झाकळ' [1991] ह्या दोन कादंबरी 'घुमसट' ही दलित समाजातील आंतरद्ववांची कैफियत मांडते तर 'झाकळ' ही जन्मापासून दुर्धर रोगाने पिडीत अशा एका तरूणीचे करूणाजन्य चित्र रेखाटते.

**उत्तम बंडू तूपे** ः 'काटयावरची पोटं' [1941], या आत्मकथनाने प्रकाशात आलेल्या उत्तम बंडू तूपे यांची दलित जीवनावर लिहीलेल्या कादंवयांनाही तितकेच महत्वाचे स्थान आहे. 'झुलवा' [1986], 'शेवंती' [1986], 'शेवती' [1996], 'लांबलेल्या सावल्या' [1992], 'चिपाड' [1989], 'खाई' [1988], 'इजाळ' [1984], 'खुळी' [1991], 'झावळी' [1991],

'भस्म' [1996], 'साक्षारी' ह्या त्यांच्या कादंब-या. दुष्ट रूढीतून मुक्त होऊन नवे जीवन जगण्याची जिद्दनिर्मान व्हावी हा उद्देश 'झुलवा' त दिसतो, तर 'शेवती' या अनौरस पण दलित समाजात वाढलेल्या तरूणीच्या सुख दुःखाची कहाणी. माणूस असूनही मसणवाट्यात राहण्याची सक्ती समाजाने केली. त्याविरूध्द उभे राहून नवे जीवन जगण्याची जिद्द निर्माण व्हावी हा उद्देश 'झुलवा' त दिसतो तर 'शेवती' या अनौरस पण दलित समाजात वाढलेल्या तरूणीच्या सुख दुःखाची कहाणी. माणूस असूनही मसणवाट्यात राहण्याची सक्ती समाजाने केली. त्याविरूध्द उभे राहून नवे जीवन जगण्याची आकांक्षा बाळगणाया तरूणाची जिद्द 'भस्म' मध्ये चित्रीत केली आहे. 'इजाळ' ही खेड्यात राहणाया एका मातंग कुटुंबाची कहाणी. 'लांबलेल्या सावल्या' 'चिपाड', 'खूळी' या कादंबरी शेतकयांच्या जीवनावर आधारित आहेत. साक्षारी ही निव्वळ रंजनप्रधान बोलपटाच्या वळणाची कादंबरी आहे.

**माधव कोंडविलकर** ः पिढ्यानपिढ्या दडपल्या गेलेल्या आणि सोशिकतेने जीवन जगणा-या चर्मकार समाजाच्या दुःखभोगाचा आलेख. 'अजून उजाडायचं आहे' [1981] या कादंबरीत कोंडविलकर प्रभावीपणे रेखाटतात. 'अमान' [1981] ही कादंबरी दारिद्र्य अज्ञान जातीयता मानसिक त्रास यांना न जुमानता आपले उज्ज्वल भविष्य निर्माण करण्यास कटिबध्द झालेल्या झुंजार तरूणाचा जीवनपट आहे. जातीयतेची भीषणता 'अजून उजाडायच आहे' [1981] या कादंबरीत चित्रीत केली आहे. 'छेद' [1983] ही कोंडविलरांची धीट विषयावरील कादंबरी. चांभार जातीतील तरूणी आणि मांग जातीतील तरूण यांच्या विवाहामुळे निर्माण झालेल्या सामाजिक प्रश्नांचा वेध येथे घेण्यात आला आहे. ग्रामीण जीवनातील शोषण वर्चस्वखोरी वंचितांच्या जीवघेण्या समस्या यांवर प्रकाश टाकून नायकाच्या माध्यमातून परिवर्तनाचा विचार मांडणारी 'झपाटलेला' [1986] ही कादंबरी. मुंबईतील गिरणी कामगारांच्या जीवनाचा आणि त्यांच्या प्रश्नांचा वेध 'देशोधडी' [1998] या कादंबरीत घेण्यात आला आहे. 'डाळं' [1996] ही कोकणातील कुणबी समाजातील दारिद्र्याशी झुंजणा-या कुटुंबाची कहाणी.

**योगेंद्र मेश्राम** ः कथा लेखनाबरोबराच कादंबरी लेखनाच्या क्षेत्रात पदार्पण करणा-या योगेंद्र मेश्राम यांनी आपल्या 'माझं गाव कुठाय' [1988] या पहिल्या कादंबरीत विषमतावादी समाज व्यवस्थेवर जळजळीत टीका केली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी म. गांधीना 'मला मातृभूमी नाही' असे ठणकावून सांगितले होते. तोच धागा पकडून मेश्रामांनी या कादंबरीत भारतीय समाज व्यवस्थेचे वस्त्रहरण केले आहे. केवळ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांमुळेच आपल्याला आपला गाव सापडेल अशी या कादंबरीतील नायकाची मनोधारणा आहे. 'झाकली झोल' ही [1990] मध्ये प्रकाशित झालेली मेश्रामांची दुसरी कादंबरी. आजही दलितांची कशी मुस्कुटदाबी केली जाते व त्यासाठी नवनव्या तंत्रांचा कसा वापर केला जातो. याचे वस्तुनिष्ठ व मर्मग्राही वर्णन या कादंबरीत घडते.

**शरणकुमार लिंबाळे** ः कविता कथा आणि आत्मकथन या वाङ्मयीन प्रकारातील शरणकुमार लिंबाळे यांची निर्मीती मौलिक आहे. कादंबरी लेखनाच्या क्षेत्रातही त्यांनी आपला ठसा उमटवला आहे. 'दंगल' व 'परपुरूष' या दोन लघु कादंबरी एकत्र 'भिन्नलिंगी' [1991], या नावाने प्रकाशित आहेत. 'परपुरूष' मध्य दलित चळवळीतील एका कार्यकर्त्याला सरकारी नोकरी करताना कसे छळवणुकीच्या प्रसंगांना सामोरे जावे लागते व नंतर तो कसा बदलत जातो याचे प्रथमपुरूषी निवेदनातून चित्रण आले आहे. 'उपल्या' [1998] ही लिंबोळे यांची राजकीय कादंबरी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या महानिर्वाणानंतरच्या राजकीय नेतृत्वतील अंतर्गत कलहावर कठोर टीका या कादंबरीत आहे. राजकीय नेतृत्व आपल्याच हाती असावे यासाठी राजकीय नेते कसे धडपडतात्र याचे अतिशय उपरोधिक चित्र लिंवाळे यांनी रेखांकित केले असून माकडांमध्ये सर्वावर अधिकार गाजवणारा 'उपल्या' [माकड] असतो. तशी दलित राजकीय नेत्याची संभावण कादंबरीकाराने केली आहे.

**विलास अंभोरे** ः दलित आणि ग्रामीण जीवनाचे यथार्थ चित्रण करणारे कादंबरीकार विलास अंभोरे यांच्या 'आघात' [1993], 'महाप्रलय' [1994], 'उल्लंघन' [1997] आणि 'लोढण' [1997] ह्या कादंब-यांनी दलित कादंबरी विश्वात फार मोठी भर घातली आहे. स्वातंत्रेत्तर कालखंडात ग्रामीण परिसरात सरंजाम वृत्ती कशी बेदरकार बनली आहे. दलितांवर अनन्वित अत्याचार कसे केले जातात त्यांची अगतिकता इत्यांदीचे विदारक चित्रण अंभोरे यांच्या कादंबरीमधून येते. गावगाड्यातील दलितांची कोंडी 'आघात' मध्ये प्रतीत होते. जीवन म्हणजे 'महाप्रलय' च. असे दुस-या कादंबरीतील नायकाला वाटते आणि तो संघर्षासाठी तयार होतो. सावकारशाहीने त्रस्त झालेले पण त्याविरूध्द प्रतिकार करणारे दलित 'उल्लंघन' मध्ये भेटतात. 'लोढण' ही परंपरेने चालत आलेली दलितांची दुःखयात्राच. विलास अंभोरे आपल्या कादंबरीतून दलितांच्या दुरवस्थेचे चित्र

जितक्या प्रभावीपणे साकारतात तितक्याच प्रभावीपणे लढाऊ स्वाभिमानी आणि आंबेडकरी जाणिवा जगणारे व परजणारे दलित स्त्री पुरूषही चितारतात.

**अन्य काही दलित कादंबरीतः** ज. वि. पवार यांची 'बलिदान' [1970] ही कादंबरी दलित राजकीय आघाडीवरील नेतृत्वाची कशी शोकांतिका झाली याचे परखड परिक्षण करते. 'युगप्रवर्तक' [1970] मध्ये हरिभाऊ पवार यांनी बाबासाहेबंचे चरित्रचित्रण केले आहे. प्रस्थापित समाजाच्या शोषणविरूध्द युध्द प्रवृत्त होणारा आणि दलितांना विज्ञानदृष्टी देणारा नायक 'निष्ठा' [1974] या अशोक लोखंडे यांच्या कादंवरीत भेटतो. 'अमृतनाक' [1980] ही भि. भि. शिंदे यांची ऐतिहासिक पार्श्वभूमी असलेली कादंवरी. मोगल राजवटीतील एका पराक्रमी निष्ठावान चारित्रसंपन्न अशा अमृतनाक नावाच्या महार सरदाराचा जीवनपट कादंवरीकाराने उभा केला आहे. मुरलीधर भोसेकर हे प्राधान्याने रंजनप्रधान कादंबरी लिहीत असले तरी 'सिध्दार्थाची यशोधरा' [1975], 'कपिलवस्तूचा राजकूमार' [1977], नामदेव ढसाळ 'हाडकी हाडवळ' [1981]या भगवान बुध्दाच्या जीवनाशी निगडीत असणा-या कादंबरी त्यांनी लिहिल्या आहेत. सुधाकर गायकवाड यांची 'शुद्र' [1980] ही बहुचर्चीत कादंबरी. शूद्रांच्या जीवनावरचा शूद्रत्वाचा डाग पुसून स्वाभिमानाचे जीवन त्यांना जगता येणार नाही का या प्रश्नांचा शोध घेणारा नायक भिक्षू सुवुध्दू यांच्या सहवासाने कस कसा विशाल व व्यापक दृष्टिकोन संपादन करतो हे कादंबरीकाराने 'शूद्र' मध्ये विशद केले आहे. 'झळ' [1980] ही बाबूराव गायकवाड यांची मातंग समाजाच्या दुःखदैन्याचे विदारक  चित्र रेखाटणरी कादंबरी. माधव कसबे 'नकूल' मध्ये सवर्न्न लोक दलितांच्या अडचणींचा कसा लाभ उठवतात व त्यांना परवश करतात याची अंतर्मुख करणारी कैफियत मांडतात. 'हाडकी हाडवळा' [1981] ही महारांची सामुहिक जमीन. नामदेव ढसाळ आपल्या या आत्मकथनात्मक कादंबरीमध्ये हाडकी हाडवळयात महार कसे दारूण जीवन जगतात याचे दर्शन घडवितात. सामाजिक चळवळी व्यापक व्हाव्यात म्हणून धडपडणाया परंतु समाजाची मानसिकता बदलत नाही ही निराशा अनुभविणाया दलित तरूणाची मानसिक कोंडी विजय सिरसट यांनी 'कुस्ती' [1982] मध्ये व्यक्त केली आहे. दलितांना उच्चभ्रू समाज कसा वागवतो याची अनुभव गाथा म्हणजे प्रेमानंद गज्वी यांची 'जागर' [1982] ही कादंबरी होय. अस्पृश्यातील ढोर, चांभार, महार, मांग या जातीमध्ये अंतर्गत कलह कसा असतो याची वस्तुविष्ठ कहाणी अशोक व्हटकर यांनी 'मेलेलं पाणी' [1982] मध्ये विशद केली आहे. या संपूर्ण कादंबरीत अस्पृश्य समाजातील ढोर जातीच्या व्यथा वेदना आणि कष्टप्रद जीवनाचे दर्शन घडते. पण ह्या अस्पृश्य जाती परस्परांपासून दूर का राहिल्या याचा शोध घेण्याचा साक्षेप जे. जी. माने ह्यांनी 'मुक्ती' [1984], मध्ये केला आहे. या कादंबरीत महोतर व चर्मकार समाजाची तरफदारी आणि बौध्द समाजाची प्रत्यक्षाप्रत्यक्ष निंदा आली आहे. आंबेडकर चळवळीतील दलित कार्यकर्त्यांचे आयुष्य सुखापेक्षा दुःख आणि निराशेने भरलेले असते ह्याचे दर्शन मुरलीधर जाधव 'कार्यकर्ता' [1984] मध्ये घडवितात. जयप्रकाश गवळे 'वेदना' [1984] मध्ये दलितांच्या सुन करणा-या जीवनानूभावर प्रकाश टाकतात. दलितांचे आक्रंदन शशिकांत तासगांवकरांच्या 'आक्रंदन' [1989] आणि प्रज्ञावंत गौतम यांच्या 'आक्रंदन' [1990] ह्या कादंबरीमध्ये येते. या दोन्ही कादंबरी  दलितांवर होणा-या अन्याय अत्याचारांवर आधारित आहेत. शिक्षण क्षेत्रातील जातीयता वर्णवर्चस्वाची खुमखुमी आणि त्यामुळे दलित प्राध्यापकांची होणारी मानसिक कोंडी ह्यांवर वैजनाथ कळसे ह्यांनी  'तीन भिंती' [1990] मध्ये प्रखरपणे प्रकाशझोत टाकला आहे. अरविंद सोनावल यांची 'तलाठी' ही 1979 मध्ये प्रकाशित झालेली दलित तलाठ्याच्या जीवनावरील कादंबरी.

**नव्वदोत्तर दलित कादंबरीकारः**

या कालखंडात नामवंत आणि नवोदित अशा अनेक दलित लेखकांच्या कादंवरी प्रकाशित झाल्या आहेत. त्यापैकी काही पुढीलप्रमाणे ःउत्तम बंडू तुपे [झुलवा], नामदेव कांवळे [राघवेळ], लक्ष्मण गायकवाड [वकिल्या पारधी], योगीराज वाघमारे [सभापती, गहिवर, पडझड], नामदेव कांबळे [श्राध्द], बंधु माधव [वगसम्राट रमाई], लक्ष्मण गायकवाड [दुभंग], शंकरराव सुरडकर [आता मी कुठे हो जाऊ], यशवंत मनोहर  [रमाई], माधव सरकुंडे [वाडा], गोरख भालेराव [या जन्मावर शतदा प्रेम करावे], सुखदेव ढाणके [चेडा], बी. रंगराव [सोमा], चंद्रहास गम्वे [चंदुची बायको], बळवंत कांवळे [जोगव्याचे दिवस], विनायक मीठबावकर [हे जगण का], जी. के. ऐनापुरे [अभिसरण], पांडूरंग कदम [कृष्णपक्ष], दि. रा. वाघमारे [कल्लोळ], जयवंत व्हटकर [जटायु], रमेश इंगळे [परिवर्तन], कचरू भालेराव [स्मशानभुमी], योगीराज वागुल [पाचट],

करूणा जमदाडे [रमा], रमाकांत जाधव [सोनबा], दा . स . गजघाटे [ज्योतीकांता सावित्री], विजय काळे [जागृती] प्रा . राज जगताप [गाव तिथे बुध्द विहार], शेषराव ढवळे [महाकारणी तथागत], माया दामोदर [आहुती] सूर्या दुर्गे [दानत] शिल्पा कांबळे [निळया डोळयाची मुलगी] इत्यादी होय .

वरील दलित कादंबरींचा विचार करता संशोधनाच्या सोयीसाठी अशी मांडणी करता येणे शक्य आहे की, **1** . सामाजिक व सांस्कृतिक विषयांचा शोध घेणा-या कादंबरी **2** . राजकीय विषयांवरील कादंबरी **3** . चरित्रात्मक व आत्मकथनात्मक कादंब-या **4** . ऐतिहासिक विषयांवरील कादंबरी या प्रमाणे होय .

**सारांश ः**

साहित्य समाजाचा आरसा आहे . लेखक जगलेले, भोगलेले, अनुभवलेले व पाहिलेले जीवन काही विचार, भावना व कल्पनाच्या संमिश्रणातून भाषेतून कल्पकतेने आपल्या साहित्यातून मांडतो आणि साहित्य निर्माण होते . दलित साहित्यही त्याला अपवाद नाही . समाजाला प्रबोधन घडावे, मार्गदर्शन व्हावे, मनोरंजन व्हावे अशी साहित्याकडून अपेक्षा असते . यादृष्टीने दलित कादंबरीकारांनी लेखन केले आहे . तथापि गावकुसाबाहेरील दलित जीवन तसेच घटनाकार डॉ . बाबासाहेब आंबेडकरांच्या क्रांतिकारक विचार-तत्वज्ञानाचे चित्रण घडविण्यात बहुतांश दलित कादंबरीकार निश्चितच यशस्वी ठरताना दिसतात . दलित कविता, कथा व आत्मकथन यांच्या तुलनेत दलित कादंबरी निर्मिती अल्पप्रमाणात झाली आहे . कादंबरीच्या तुलनेने दलित लेखकांना कविता, कथा व आत्मकथन हे लेखन प्रकार अधिक जवळचे वाटतात . नवोदोत्तर दलित कादंबरीकारांनी जागतिकीकरणानंतर दलित समाजापुढे नव्याने निर्माण झालेल्या समस्यां बरोबरच डॉ . आंबेडकरांच्या धर्मांतरानंतरची जाणीव-जागृती प्रामुख्याने मांडताना दिसतात . काही कादंबरीकारांनी डॉ . आंबेडकरांच्या विचार-कार्यावर कादंबरीतून भाष्य करताना त्यांच्या महाडच्या चवदार तळयाचा सत्याग्रह, काळाराम मंदिर प्रवेशाचा सत्याग्रह व गांधी आंबेडकर यांच्या पुणे करारावर कल्पकतेने भाष्य केले आहे . हा संपूर्ण लढा सचित्र उभा करण्यात येथे ते यशस्वी ठरतात . दलित समाजातील शिक्षणाबरोबरच नोकरीच्या समस्यांवर काही कादंबरी मधून भाष्य येते . दलित समाजातील स्वाभिमानाबरोबरच या समाजात नव्याने उदयास आलेल्या स्थानिक नेतृत्वाचे तसेच त्यांच्यातील अंतर्गत गटातटाच्या राजकारणावरही काही कादंबरीकार कौशल्याने भाष्य करतात . वैराने वैर वाढते, दया, क्षमा, शांती, सदाचार व शिक्षणाशिवाय समाजाचा विकास होऊ शकत नाही . परिस्थितीचे रडगाणे न गाता परिस्थितीवर मात करून स्वाभिमानाने जगले पाहिजे असा विचार देणा-या वरील दलित कादंब-या महत्वाच्या ठरतात . स्वातंत्र, समता, बंधुता व सामाजिक न्याय या मानवी मूल्यांची शिकवण देणा-या, अखिल मानवाच्या कल्याणाचा विचार मांडणा-या या कादंब-यांचा समग्रतेचा परिप्रेक्ष्य ठेऊन संशोधनात्मक अभ्यास होणे आवश्यक आहे .

**काही निरिक्षणे ः**

**1** . या दलित कादंबरीतून अस्पृश्य समाजातील विविध जाती धर्माचे, त्यांच्यातील रूढी, प्रथा- परंपरांचे, अस्पृश्यतेमुळे त्यांना भोगाव्या लागणा-या दुःखाचे चित्रण येते .

**2** . डॉ . आंबेडकरांच्या धर्मांतरानंतर दलित समाजात आलेल्या जाणीव-जागृतीचे चित्रण मुख्यत्वे करून दलित कादंब-यातून येते .

**3** . दलित समाजावर टाकण्यात आलेल्या बहिष्काराचे आणि त्यामुळे त्यांच्या निर्माण झालेल्या न्यूनगंडाचे चित्रण काही कादंब-यातून येते .

**4** . डॉ . आंबेडकरांच्या विचार कार्यामुळे प्रभावित होऊन या समाजात नव्याने उदयास आलेले राजकारण, धर्मकारण याबरोबरच डॉ . आंबेडकरांचा महाड चवदार तळयाचा सत्याग्रह नाशिकच्या काळाराम प्रवेशाचा सत्याग्रह याचे चित्रण येते . तर काही कादंब-यातून पुणे करारावर कलात्मक भाष्य आढळते .

**5** . दलित समाजात डॉ . आंबेडकरांच्यामुळे आलेली जागृती शिक्षणाचे वाढलेले प्रमाण त्यातून जागृत झालेला स्वाभिमान कल्पकतेने प्रकटतो .

6. दलित समाजातील सामाजिक स्थित्यंतरा बरोबरच या समाजातील अंतर्गत संघर्षावरही प्रखर भाष्य करणाया कादंब-या मोठया प्रमाणात आहेत.

**संदर्भ ग्रंथः**

1. प्रा. डॉ. डी. आर. गायकवाड, हकिकत आणि जटायू : एक समालोचन, निर्मिती विचार मंच कोल्हापूर 02 सप्टेंबर 2006.
2. डॉ. गंगाधर पानतावणे, मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड सातवा दलित वाङ्मय 1950 ते 2000 भाग चौथा. महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे -30
3. प्रा. डॉ. डी. आर. गायकवाड, हकिकत आणि जटायू : एक समालोचन, निर्मिती विचार मंच कोल्हापूर 02 सप्टेंबर 2006.
4. डॉ. गंगाधर पानतावणे, मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड सातवा दलित वाङ्मय 1950 ते 2000 भाग चौथा. महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे -30
5. भालचंद्र नेमाडे, दलित साहित्य वेदना आणि विद्रोह, श्रीविद्या प्रकाशन, पुणे
6. शंकरराव खरात, दलित साहित्य प्रेरणा व प्रवृत्ती, इनामदार बंधू प्रकाशन, पुणे
7. प्रभाकर मांडे, दलित साहित्याचे निराळेपण, धारा प्रकाशन, औरंगाबाद.
8. वसंत डोळस, दलित साहित्य प्रेरणा आणि स्वरूप, दिलीपराज प्रकाशन प्रा. लि. पुणे.